
G20
भारत 2023 INDIA

# जी 20 - एक प्राइमर

## जी 20 यूनिवर्सिटी कनेक्ट साठी
## पार्श्वभूमि (बेक ग्राउंड नोट)



वसुधैव कुटुम्बकम् | ONE EARTH • ONE FAMILY • ONE FUTURE

## स्वीकृती

आर.आय.एस चे महासंचालक प्राध्यापक सचिन चतुर्वेदी यांच्या सर्वसमावेशक मार्गदर्शनाखाली 'जी 20 - एक प्राइमर' तयार करण्यात आलेले आहे. मनीष चंद, टी.जी.आय.आय मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली आणि सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रियदर्शी दास; दुर्गेश राय, सोबती (फेलो); डॉ. राहुल रंजन, सल्लागार (कन्सल्टंट); डॉ. सायंतन घोषाल, सल्लागार (कन्सल्टंट); हे सर्व सामील असलेल्या आर.आय.एस पथकाने (टीमने) या दस्तऐवजासाठीचा मूलभूत मजकूर दिलेला आहे.

आम्ही श्री. अमिताभ कांत, जी 20 शेर्पा; श्री. हर्ष वर्धन श्रृंगला, मुख्य समन्वयक (जी 20 ); श्री. मुक्तेश परदेशी, ओ.एस.डी (जी 20 ); श्री. अभय ठाकूर, अतिरिक्त सचिव आणि सौस-शेर्पा (जी 20 ) आणि डॉ. सुमित सेठ, संयुक्त सचिव (नीती नियोजन आणि संशोधन) परराष्ट्र मंत्रालय, यांनी दिलेल्या मार्गदर्शनासाठी आणि पाठिंब्यासाठी त्यांचे मनापासून आभारी आहोत.

प्रकाशन अधिकारी, श्री. तिश मल्होत्रा आणि प्रकाशन सहाय्यक, श्री. सचिन सिंघल यांचा समावेश असलेल्या आर.आय.एस प्रकाशन पथकाने (टीमने) अहवालाच्या निर्मितीचे व्यवस्थापन केलेले आहे.

कॉपीराइट © आर.आय.एस, 2022

2022 मध्ये यांनी प्रकाशन केले आहे : आर.आय.एस

भारत 2023 INDIA

# भारत@जी 20
# उमेद, एकोपा आणि शांततेचे अध्यक्षपद

उमेद, सामंजस्य, शांतता आणि स्थैर्य - हे परिभाषित विचार आहेत जे जगातील सर्वात प्रगत आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या जी 20 गटात भारताचे अध्यक्षपद ठरवतील. जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या भारताला वाढते ध्रुवीकरण आणि भू-राजकीय तणाव वाढत असताना जागतिक विषयपत्रिका (अजेंडा) तयार करण्याची, विस्कळीत जगात शांतता, स्थैर्य आणि संयुक्त हितसंबंधांना चालना देण्याची मोठी संधी जी 20 प्रदान करत आहे.

## सर्वसमावेशक आणि कृतीप्रधान

16 नोव्हेंबर 2022 रोजी इंडोनेशियाच्या बाली बेटावर जी 20 शिखर संम्मेलनाच्या समारोपाच्या सत्रात इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष जोको विडोडो यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जी 20 अध्यक्षपदाची सूत्रे प्रतीकात्मकरित्या सोपवली. भारताने 1 डिसेंबर 2022 रोजी अधिकृतरित्या जी 20 चे अध्यक्षपद स्वीकारले, जे 30 नोव्हेंबर 2023 पर्यंत राहील. बालीमध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताचे जी 20 अध्यक्षपद हे "सर्वसमावेशक, महत्त्वाकांक्षी, निर्णायक आणि कृतीप्रधान असेल", असे आश्वासन जगाला दिले. भारताच्या अध्यक्षपदाचे प्रमुख विषय आणि प्राथमिकता ठळकपणे मांडताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, जी 20 मध्ये शांतता आणि एकोप्याच्या बाजूने एक मजबूत संदेश द्यावा लागेल आणि शांतता आणि सुरक्षिततेशिवाय, "आपल्या भावी पिढ्यांना आर्थिक विकासाचा किंवा तांत्रिक नवउपक्रमांचा लाभ घेता येणार नाही."

## जी 20 लोगो: फुललेल्या पाकळ्या, सात पाकळ्या

भारताच्या जी 20 संम्मेलनाचे सार "एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य" या संकल्पनेत अंतर्भूत आहे आणि प्राचीन संस्कृत सामाजिक भावनिष्ठेत "वसुदैव कुटुंबकम्" म्हणून स्फटिक रूपात आहे. फुललेले कमळ आणि त्याच्या सात पाकळ्यांचा समावेश असलेला हा लोगो मानव, प्राणी, झाड आणि सूक्ष्मजीव या सर्व जीवनांचे मूल्य आणि पृथ्वी ग्रहावरील व व्यापक विश्वातील त्यांचे परस्परसंबंध ठासून सांगतो. "जी 20 लोगो मधील कमळाचे प्रतीक या काळात आशेचे प्रतिनिधित्व आहे," असे 8 नोव्हेंबर 2022 रोजी लोगोच्या अनावरण प्रसंगी पंतप्रधान मोदी म्हणाले. "कमळावरील सात पाकळ्या जगातील सात खंड आणि संगीताचे सात स्वर दर्शवितात. जी 20 जगाला सामंजस्याने एकत्र आणेल. या लोगोमध्ये, कमळाचे फूल भारताचा पौराणिक वारसा, आमची श्रद्धा, आमची बुद्धिमत्ता दर्शवित आहे," असे पंतप्रधान मोदी यांनी लोगोच्या अनावरण प्रसंगी सांगितले.

भारतासाठी जी 20 चे अध्यक्षपद हे 15 ऑगस्ट 2022 रोजी स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्धापन दिनापासून सुरू होणारे असून त्याच्या मुळाशी मानव-केंद्रित दृष्टिकोन असलेला असा भविष्यकालीन, समृद्ध, सर्वसमावेशक आणि विकसित समाजाच्या दिशेने असा 25 वर्षांचा कालावधी आहे आणि हा आपल्या स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत घेऊन जाणारा आहे.

## प्रमुख प्राथमिकता

अन्न आणि ऊर्जा सुरक्षेसारख्या बहुआयामी संकटांनी ग्रासलेल्या, ज्याला भू-राजकीय तणावाने बळ दिले असून, अशा जगात बदल व जागतिक परिवर्तनाचे सहायक म्हणून भारत आपल्या जी 20 अध्यक्षपदाकडे पाहत आहे. जग संघर्षात अडकलेले असताना, सामान्य लोकांचे जीवन धोक्यात आले असताना, भारत आपल्या जी 20 अध्यक्षपदाचा वापर जागतिक विकास, भक्कम हवामान कृती आणि मजबूत जागतिक आरोग्य रचना यासारख्या अनेक आव्हानांवर विधायक आणि सहमती-आधारित उपाय तयार करण्यासाठी करेल. महामारीने लाखो लोकांना गरिबीजवळ नेल्याने, अन्न व पोषण सुरक्षेला प्रोत्साहन देणे एक महत्वाची प्राथमिकता राहील. पुढील काही महिन्यांत शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचा वेगाने पाठपुरावा करणे आणि लाइफ (लाइफ फॉर एन्व्हायर्नमेंट) च्या माध्यमातून पर्यावरणपूरक शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी जगाला मार्गदर्शन करणे या इतर प्रमुख प्राथमिकता असतील. माहिती तंत्रज्ञानातील आपल्या मुख्य सामर्थ्यासह, सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे


सहायक बनण्यासाठी भारत डिजिटल रचनेला सर्वसमावेशक बनविण्यावर भर देत आहे. सर्वसमावेशक विकास आणि वित्तीय समावेशनाला चालना देणे ही प्रमुख प्राथमिकता असेल.

ध्रुवीकरणाच्या संघर्षांनी आणि जागतिक संस्थांच्या अधोगतीने विखुरलेल्या जगात, 85% जागतिक जी.डी.पी, 75% आंतरराष्ट्रीय व्यापार आणि जगातील 2/3 लोकसंख्या दर्शविणारी जी 20 , आता पूर्वीपेक्षा अधिक महत्वाची ठरेल. भारताच्या अध्यक्षतेखाली, भारत जागतिक आर्थिक आणि वित्तीय मुद्द्यांवर सहकार्यासाठी प्रमुख जागतिक व्यासपीठ म्हणून जी 20 चा दर्जा आणि अधिकार बळकट करण्याचा प्रयत्न करेल. शेवटी जी2 चा जन्म 2008 ची आर्थिक मंदी त्याच्या उच्च बिंदुवर असताना झाला होता आणि यामुळे जगाला विकसित आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा समावेश असलेला एक नवीन प्रतिनिधी बहुपक्षीय गट स्थापन करण्यास भाग पाडले गेले. या संदर्भात, जग "जी 20 कडे आशेने पाहत आहे" असे पंतप्रधान मोदी यांनी ठळकपणे मांडले आहे.

## अतुल्य भारत

पुढे जात, 'लोकशाहीची माता' असलेल्या भारताला त्याच्या सर्व वैभवात आणि विविधतेत दाखविण्याची संधी सुद्धा जी 20 मध्ये असेल आणि हे सर्व भारत आर्थिक प्रगतीपासून विज्ञान आणि तंत्रज्ञान, अंतराळ, नवउपक्रम आणि स्टार्ट-अप्स पर्यंत, जवळपास प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेची नवी उंची गाठत असताना हे करण्यात येणार आहे. भारतात 56 ठिकाणी जी 20 शी संबंधित 200 हून अधिक बैठका होणार आहेत आणि विविध देशांतील प्रतिनिधी या उत्साही आणि वैविध्यपूर्ण देशाला भेट देण्यासाठी येणार आहेत. अनेक पाहुण्यांसाठी, जी 20 उपक्रम त्यांची भारताची पहिली अभिरुची आणि प्रचिती असेल, आणि म्हणूनच सर्व भारतीयांनी जगाचे स्वागत करण्यासाठी आणि त्यांना एका कुटुंबाचा भाग म्हणून वागविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे. भारताच्या जी 20 अध्यक्षपदाच्या कार्यकाळात विद्यार्थी आणि संशोधकांना प्रमुख लक्ष केंद्रित क्षेत्रांची ओळख करून देण्यासाठी आणि 20 देशांच्या संघटनेचे नेतृत्व करत असताना पुढील 12 महिन्यांत भारत काय साध्य करू इच्छितो, या प्राथमिकतेच्या बाबतीत या प्राइमर मध्ये महत्त्वाच्या विषयांवर थोडक्यात लिहिलेल्या कथा सामील करण्यात आलेल्या आहेत. भारत एक जागतिक प्रभावक म्हणून आपली ओळख भक्कम करेल आणि अधिक सर्वसमावेशक आणि यथायोग्य जग तयार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जी 20 प्रक्रियेवर आपला कायम स्वरूपी ठसा उमटवेल, याची आम्ही आशा करीत आहोत.

# ऊर्जेचे अवस्थांतर:
# हरित जगाला आकार देणे



कमी-कार्बन वाढीची गती वाढविता यावी म्हणून ऊर्जेचे अवस्थांतर करण्यास प्रोत्साहन देणे हे भारताच्या चालू नवीकरणीय ऊर्जा क्रांतीची मुख्य प्राथमिकता आहे आणि भारताच्या जी 20 अध्यक्षपदाच्या विषयपत्रिकेवर ठळकपणे समाविष्ट केले जाईल. नवे निकष आणि उद्दिष्टे निश्चित करताना भारताने आधीच जाहीर केले आहे की, त्याच्या अर्ध्या विजेची निर्मिती नवीकरणीय स्त्रोतांपासून करण्यात येईल. भारतासाठी सर्वसमावेशक ऊर्जेचे अवस्थांतर करण्यासाठी कालबद्ध व परवडणारा वित्त पुरवठा आणि तंत्रज्ञानाचा शाश्वत पुरवठा विकसनशील देशांना करणे गरजेचे आहे.

नोव्हेंबर 2021 मध्ये ग्लासगो येथे झालेल्या सीओपी26 जागतिक हवामान शिखर संम्मेलनात पंतप्रधान मोदी यांनी सर्वसमावेशक ऊर्जेचे अवस्थांतर करण्याबाबतीत आपला दृष्टीकोन उघड केला, जिथे त्यांनी जगाला "पंचमित्र: (पाच अमृत) या संकल्पनेची ओळख करून दिली. पाच दृष्टिकोन असलेल्या या योजनेत पुढील गोष्टी सामील आहेत:

- भारत 2030 पर्यंत आपली अ-जीवाश्म ऊर्जा क्षमता 500 गिगावॅटपर्यंत घेऊन जाईल.
- भारत 2030 पर्यंत आपल्या उर्जेच्या गरजेपैकी 50% ऊर्जा नवीकरणीय ऊर्जेपासून पूर्ण करेल.
- भारत आजपासून 2030 पर्यंत एकूण अंदाजित कार्बन उत्सर्जन एक अब्ज टन्सनी कमी करेल.
- 2030 पर्यंत, भारत आपल्या अर्थव्यवस्थेची कार्बन तीव्रता 45% पेक्षा कमी करेल.
- 2070 सालापर्यंत भारत निव्वळ शून्यचे (नेट झिरोचे) उद्दिष्ट साध्य करेल. हे "पंचमित्र" भारताचे हवामान विषयक कृतीत अद्विितीय सहाय्य ठरतील.

भारत ऊर्जेची सुरक्षा व ऊर्जेचे अवस्थांतर यांना प्रोत्साहन देण्याकरिता प्रयत्नशील आहे आणि 2022-2023 साठी जी 20 चे आपण नेतृत्व करत असताना 'पंचमित्र' या संकल्पनेमुळे त्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन मिळणार आहे. भारताची अर्थव्यवस्था जगातील अर्थव्यवस्थांमध्ये सर्वात वेगाने वाढणारी असल्याने जागतिक विकास करता यावा म्हणून ऊर्जा सुरक्षा भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच ऊर्जा बाजारपेठेत स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी ऊर्जेच्या पुरवठ्यावर कोणत्याही निर्बंधांना भारताचा विरोध आहे.

देशाच्या ऊर्जा कोंडीसाठी नवीकरणीय ऊर्जेचा वाटा वाढविण्याकरिता सरकारने अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतलेले आहेत आणि त्यामुळे भारताच्या ऊर्जेचे अवस्थांतर करण्याच्या समर्थनाला अधिक जिवंतपणा आणि विश्वासार्हता लाभलेली आहे. भारताने व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना विजेच्या हरित स्त्रोतांकडे वळविण्यासाठी नियम शिथिल करून जीवाश्म इंधनावर आधारित

अर्थव्यवस्थेच्या कार्बनमुक्तीकरण प्रक्रियेला (डिकार्बोनायझेशनला) गती दिली आहे. जागतिक उत्सर्जनाच्या 30% भागासाठी जबाबदार अशा अवजड उद्योगाचे आणि लांब पल्ल्याच्या वाहतूक क्षेत्रांचे कार्बनमुक्तीकरण करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या फर्स्ट मूव्हर्स कोएलिशन या जागतिक उपक्रमात भारत सामील झाला आहे.

भारताने, फ्रान्ससोबत आंतरराष्ट्रीय सौर युती (आय.एस.ए) सुरू केली असून 'एक सूर्य, एक जग, एक ग्रीड (वन सन, वन वर्ल्ड, वन ग्रीड)' च्या दिशेने काम करत आहे. आय.एस.ए ही एक जागतिक सौर चळवळ बनली आहे आणि सौर ऊर्जेच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील अशा युतीत 100 हून अधिक देश सामील झाले आहेत.

ऊर्जा अवस्थांतर करण्याला चालना देण्यासाठी, स्वच्छ, शाश्वत व परवडणारी ऊर्जेचे अवस्थांतर करण्याची गती वाढवून त्याची खात्री करता यावी म्हणून ऊर्जा प्रणालीत सुधारणा आणि फेरबदल करण्याकरिता भारताने पाठिंबा दिला आहे. या संदर्भात, विकसनशील देशांना, खास करून सर्वात असुरक्षित देशांना परवडणारी, विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा, क्षमता निर्मिती, सार्वजनिक क्षेत्रामध्ये परवडणारे अद्ययावत तंत्रज्ञान, एकमेकांना फायदेशीर तंत्रज्ञानासाठी सहकार्य आणि ऊर्जा क्षेत्रातील शमन कृतींना वित्तपुरवठा करण्याच्या दृष्टीने भारत सातत्याने समर्थन देत आहे.

पुढे पाहिल्यास, सौर ऊर्जेचे उत्पादन वाढविणे आणि उद्योग व ऊर्जा उपभोक्ते यांना व्यापक वापरासाठी अधिक परवडणारे बनविण्याकरीता भारत आय.एस.ए चा फायदा उचलणार आहे. हरित विकास आणि नवीकरणीय ऊर्जेच्या दिशेने ऊर्जेचे अवस्थांतर करण्याच्या संदर्भात सौर ऊर्जेचा वापर वाढविण्यावर भारत भर देणार आहे. भारताच्या दृष्टीने सौर ऊर्जा ही भविष्यातील नवीकरणीय ऊर्जा आहे ज्यामुळे जीवाश्म इंधनावर अवलंबून राहणे लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होईल. जी 20 च्या अध्यक्षतेखाली, भारत चालू असलेल्या ऊर्जेचे अवस्थांतर करण्याला प्रोत्साहन देणार असून ते हे तंत्रज्ञान स्थानांतरण आणि माहिती स्थानांतरणाद्वारे साध्य करणार आहे. येत्या काही दिवसांमध्ये, सौर आणि नवीकरणीय तंत्रज्ञानातील नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे ही भारताची महत्वपूर्ण प्राथमिकता असेल.

# जीवन (लाइफ) मिळवा: पर्यावरणस्नेही (इको-फ्रेंडली) जीवनशैलीला प्रोत्साहन देणे

LiFE
Lifestyle For Environment

जागतिक तापमानवाढीने जगभरात थैमान घातल्याने वातावरण शब्दशः बदलेले आहे. नद्या कोरड्या पडत आहेत, हिमनद्या वितळत आहेत आणि जगातील अनेक भागात विक्रमी तापमान जाणवत आहे, ज्यामुळे सर्वत्र प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पूर, दुष्काळ, चक्रीवादळ यांसारख्या विचित्र हवामानामुळे उद्भवणाऱ्या घटनांनी आपले अस्तित्वच धोक्यात आणले आहे. या हवामान आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर, भारताने शाश्वत आणि आरोग्यदायी जीवनशैलीसाठी लाइफ-लाइफस्टाइल फॉर द एन्व्हायर्नमेंट हा देशांतर्गत उपक्रम हाती घेतला आहे आणि तो जी 20 सह जागतिक विषयपत्रिकेवर ठेवला आहे. 1 नोव्हेंबर 2021 रोजी ग्लासगो येथे झालेल्या वार्षिक जागतिक हवामान शिखर संम्मेलन, सीओपी26, मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही संकल्पना सगळ्यांना सांगितली. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी जागतिक समुदायाला पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी "विचारशून्य आणि विध्वंसक उपभोग ऐवजी जागरूक आणि जाणीवपूर्वक उपयोग" घेण्याच्या दिशेने आंतरराष्ट्रीय जनचळवळ म्हणून लाइफ चालविण्याचे आवाहन केले आहे.


लाइफ हे एखाद्या व्यक्तीला, "ग्रहाच्या, ग्रहासाठीच्या आणि ग्रहाद्वारेच्या जीवनशैली" चा पाठपुरावा करून हवामान बदलाविरूद्ध कृतीच्या केंद्रस्थानी ठेवते. गुंतागुंतीच्या बृहत धोरण परिचर्चेच्या (मॅक्रो पॉलिसी डिबेटच्या) आणि सरकार व आंतरराष्ट्रीय एजन्सी यांच्या भूमिकेच्या पलीकडे जाऊन, लाइफ हरितगृह वायू उत्सर्जन रोखण्यासाठी कार्यालय (ऑफिस) किंवा जिममध्ये जाण्यासाठी सायकलचा वापर करणे अशा जीवनशैलीत करण्यास सोप्या बदलांना प्रोत्साहित करते. लाइफला, केवळ खोलवर रुजलेल्या वैयक्तिक व सामुदायिक वर्तनात बदल केल्यास पर्यावरणीय आणि हवामान संकटात फरक पडू शकतो, या अंतर्निहित विश्वासाने प्रेरणा मिळालेली आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाच्या (युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रामच्या) (यु.एन.ई.पी च्या) अनुसार, आठ बिलियन जागतिक लोकसंख्येपैकी एक बिलियन लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक वर्तनाचा अवलंब केल्यास जागतिक कार्बन उत्सर्जन अंदाजे 20% नी कमी करता येईल. या नव्या योजनेत, अशी जीवनशैली जगणाऱ्यांना लाइफ अंतर्गत प्रो प्लॅनेट पीपल म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.

शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याच्या आपल्या ध्येयाला नवसंजीवनी देत, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्या उपस्थितीत विशाल स्टॅच्यू ऑफ युनिटीसाठी प्रसिद्ध असलेल्या केवडिया या निसर्गरम्य गुजराती शहरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मिशन लाइफ' चा शुभारंभ केला. पंतप्रधान मोदी यांच्या म्हणण्यानुसार, मिशन लाइफ हवामान बदलाविरूद्धचा लढा लोकशाही बनवत आहे, कारण त्याला प्रत्येकाने आपापल्या क्षमतेप्रमाणे हातभार लावलेला आहे. 'मिशन लाइफ' मुळे लोकाभिमुख ग्रहाच्या (प्रो-पीपल प्लॅनेट च्या) संकल्पनेचे सामर्थ्य वाढेल, असे ठळकपणे मांडून, यामुळे "पी-3 मॉडेल अर्थात प्रो-प्लॅनेट पीपल" ची भावना बळकट होईल, अशी आशा पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली. पुनर्वापर करणे, कमी करणे आणि पुनर्प्रक्रिया करणे हे भारताच्या परंपरा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत आणि हे लोकांना शाश्वत निवड करण्यास प्रोत्साहित करत असल्याने मिशन लाइफचा सुद्धा एक भाग बनले आहे.

लाइफ कृती योजनेत व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन जीवनात (मागण्यास) सोप्या परंतु प्रभावी पर्यावरण-स्नेही कृती करण्यास प्रवृत्त करणे याचा समावेश आहे ज्यामुळे उद्योग आणि बाजारपेठांना बदलत्या मागणीला (पुरवठा) त्वरित प्रतिसाद देता येईल आणि शाश्वत उपभोग व उत्पादन (धोरण) या दोन्हीस समर्थन देण्यासाठी सरकार व औद्योगिक धोरणावर प्रभाव पाडता येईल.

जागतिक आरोग्यासाठी लाइफची परिवर्तनीय क्षमता लक्षात घेता, भारताने शाश्वत जीवनशैलीला जी 20 विषयपत्रिकेवर ठेवलेले आहे. जी 20 चा जागतिक जीडीपी मध्ये 80% वाटा तसेच जागतिक हरितगृह वायू उत्सर्जनात 80% वाटा आहे. भारताच्या दृष्टीने, जी 20 ही हरित जीवनशैलीची जागतिक चळवळ बनवण्यासाठी सुसज्ज आहे. हवामान बदलाविरुद्धच्या लढाईत जगाला मिशन लाइफची मदत होईल आणि शाश्वत जीवनशैलीकडे घेऊन जाईल जेणेकरून संयुक्त राष्ट्रांनी ठरवून दिलेली शाश्वत विकास लक्ष्ये साध्य करता येतील. या संदर्भात, पंतप्रधान मोदी यांनी 15 नोव्हेंबर 2022 रोजी बाली येथे जी 20 शिखर संम्मेलनात आपल्या भाषणात लाइफचे महत्त्व ठळकरीत्या मांडले. "पृथ्वीच्या सुरक्षित भवितव्यासाठी विश्वस्तपद्धतीची भावना हाच उपाय आहे. लाइफ मोहीमेला याकरिता मोठ्या प्रमाणात हातभार लावता येईल. शाश्वत जीवनशैलीला जनचळवळ बनविणे हा त्याचा उद्देश आहे". हवामान बदलावरील जागतिक चर्चा बदलण्याच्या भारताच्या प्रयत्नांची दखल घेत, शाश्वत विकास व जीवनशैली, संसाधन कार्यक्षमता आणि वर्तुळाकार अर्थव्यवस्था या संकल्पनेचे 'जी 20 बाली नेत्यांच्या जाहीरनाम्यात' समर्थन करण्यात आलेले आहे.

भारताच्या जी 20 च्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात, लाइफला आंतरराष्ट्रीय समुदाय तसेच भारतातील आरोग्यदायी हरित जीवनशैलीची आकांक्षा बाळगणाऱ्यांचा पाठिंबा मिळाल्याने त्याला आणखी गती मिळेल. येत्या काही महिन्यांमध्ये, लाइफ हा हवामान बदलाचा सामना करण्यासाठी जागतिक मंत्र ठरणार आहे. मिशन लाइफला जागतिक नेत्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे आणि हरित परिवर्तन घडवून आणण्यासाठी "वसुदैव कुटुंबकम्" या आध्यात्मिक आदर्शाची सांगड घालण्याच्या भारताच्या उपक्रमाची त्यांनी प्रशंसा केली आहे. 'एक पृथ्वी एक ग्रह एक भविष्य' हे भारताच्या जी 20 अध्यक्षपदाचे ब्रीदवाक्य असून जीवनसमर्थक (प्रो-लाइफ) ग्रह आणि लोकांचे सार त्यात अंतर्भूत केलेले आहे. मिशन लाइफ हे पृथ्वीला वाचविण्यासाठी नागरिक आणि सरकार यांनी कृती करण्याचे एक रणशिंग (स्पष्ट) आवाहन आहे.




# दरी भरून काढणे: डिजिटल सार्वजनिक सामान (वस्तू)

कोव्हिड नंतरच्या जगात डिजिटल परिवर्तन ही नवी सामान्य गोष्ट आहे. कोव्हिड-19 च्या पार्श्वभूमीवर, इंटरनेट हे आपले वर्ग, आपले कार्यक्षेत्र, बैठकीची जागा आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी पसंतीचे व्यासपीठ म्हणून सामोरे आले. डिजिटलची परिवर्तनीय क्षमता लक्षात घेता, पंक्तीत (स्पेक्ट्रममध्ये) डिजिटल परिवर्तनाचा वेग वाढविणे हे येत्या काही महिन्यांत भारताच्या जी 20 अध्यक्षपदाचे आणि राजनैतिक संपर्काचे प्रमुख क्षेत्र असेल. या डिजिटल परिवर्तनात डिजिटल अर्थव्यवस्था, डिजिटल वित्त, डिजिटल सरकार, डिजिटल आरोग्य आणि डिजिटल शिक्षण सामील असतील.

डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग दारिद्र्याविरुद्ध आणि हवामान बदलाविरुद्धच्या लढ्यातही करता येईल. या पार्श्वभूमीवर, भारताला आपली डिजिटल परिवर्तनगाथा दाखवून नेतृत्व करता येईल आणि त्यात असे सांगता येईल की, 2014 च्या 50% च्या तुलनेत 80% हून अधिक भारतीयांकडे आता बँक खाती आहेत आणि विकसित व विकसनशील देशांना या क्षेत्रातील आपले कौशल्य सांगता येईल.

भारत डिजिटल रचनेला समाविष्ट करण्यावर भर देत आहे जेणेकरून त्याला सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे सहायक बनता येईल. प्रशासनात पारदर्शकता वाढविण्यासह महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये व्यापकता आणि गती प्राप्त करण्यासाठी डिजिटल परिवर्तन महत्वाचे असते. भारताने विकसित केलेली डिजिटल सार्वजनिक वस्तूंची रचना ही लोकशाही तत्त्वांशी जोडलेली आहे. हे उपाय खुले स्रोत (ओपन सोर्स), खुले (ओपन) ए.पी.आय, खुले मानक (ओपन स्टँडर्ड्स) यांच्यावर आधारित आहेत, जे आंतर संचालित आणि सार्वजनिक आहेत. युनिफाइड पेमेंट इंटरफेस (यु.पी.आय), ज्यासाठी भारताने पुढाकार घेतलेला आहे, हे डिजिटल सार्वजनिक वस्तूंचे अभिजात उदाहरण आहे. गेल्या वर्षी, जगातील 40% हून अधिक वास्तविक देय देण्याचे (रिअल टाइम पेमेंट) व्यवहार यु.पी.आय च्या माध्यमातून झाले होते. त्याचप्रमाणे, डिजिटल ओळखीच्या आधारे 460 मिलियन नवीन बँक खाती उघडण्यात आली होती, ज्यामुळे भारत आज आर्थिक समाविष्टीत जागतिक स्तरावर अग्रेसर आहे. मानवी इतिहासातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम म्हणून भारतातील खुले स्रोत (ओपन सोर्स) कोव्हिन प्लॅटफॉर्मकडे पाहिले जात आहे.

आधार, दीक्षा, स्वयं हे भारताने गेल्या काही वर्षांत उभारलेल्या सार्वजनिक डिजिटल पायाभूत सुविधांचे काही महत्त्वाचे घटक आहेत. भारताला युलिपची (युनिफाइड लॉजिस्टिक्स इंटरफेस प्लॅटफॉर्म) प्रगती करावी लागणार आहे आणि ओ.एन.डी.सी (ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स) तयार करण्याच्या प्रक्रियेत आहे.

परंतु भारताची डिजिटल पोहोच सार्वजनिक करत असताना, आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात डिजिटल दरी पहायला मिळते. जगातील बहुतांश विकसनशील देशांतील नागरिकांना कोणत्याही प्रकारची डिजिटल ओळख नसते. केवळ 50 देशांमध्ये डिजिटल देय भरण्याची प्रणाली (पेमेंट सिस्टीम) आहे. या संदर्भात, जगातील कोणतीही व्यक्ती डिजिटल तंत्रज्ञानाच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून भारत प्रत्येक माणसाच्या जीवनात डिजिटल परिवर्तन घडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. बाली येथे झालेल्या जी 20 संमेलनात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगाला सांगितले

की, जी 20 अध्यक्षपदाच्या काळात भारत या उद्दिष्टासाठी जी 20 भागीदारांसोबत एकत्रीतपणे काम करणार आहे.

"विकासासाठी माहिती" हे तत्त्व आमच्या अध्यक्षपदाच्या "एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य" या एकूण विषयासूत्राचा अविभाज्य भाग असेल.

दारिद्र्य, शिक्षण, आरोग्य आणि थेट लाभ स्थानांतरण - या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटल परिवर्तन ही गुरुकिल्ली म्हणून भारत डिजिटल परिवर्तनाकडे पाहत आहे. डिजिटल परिवर्तनाचे फायदे मानवजातीच्या एका छोट्या भागापुरते मर्यादित राहू नयेत, यासाठी भारत इतर जी 20 देशांसोबत सुद्धा काम करेल.

पुढे जाऊन डिजिटल आणि हरित होणे या मोठ्या संधी आहेत. "400 दशलक्ष लोकं असे आहेत ज्यांना डिजिटल ओळख नाही; 200 मिलियन लोकांकडे बँक खाती नाहीत; कारण सुमारे 133 देशांमध्ये जलद देय भरण्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे जग बदलण्यासाठी वापरता येणारी ही मोठी संधी आहे," असे मत भारताचे जी 20 चे अध्यक्ष अमिताभ कांत यांनी व्यक्त केले.



# पर्यावरणाला वित्त : हरित विकासाला निधी

हरित अवस्थांतर आणि हरित विकास यांचा वेग वाढविण्यासाठी हवामान वित्त ही मुख्य गुरुकिल्ली आहे. जागतिक तापमानवाढीच्या घातक परिणामांविषयी जग अधिकाधिक जागरूक होत असताना विकसित देशांकडून विकसनशील देशांना हवामानविषयक अर्थसाहाय्य वेळेत उपलब्ध करून देण्याची निकड निर्माण झाली आहे. मोठ्या प्रमाणावरील हरितगृह वायूंच्या उत्सर्जनासाठी विकसित देशांना ऐतिहासिकदृष्ट्या जबाबदार धरले गेले असल्याने भारताने सातत्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर हवामान वित्तपुरवठ्याची मागणी केली आहे. या तर्काच्या आधारे भारताने इतर विकसनशील देशांसह जी 20 मध्ये हरित अवस्थांतर करण्यासाठी निधी देण्याकरिता हवामान वित्तपुरवठ्याचे जलद गतीने मार्गनिरीक्षण (फास्ट-ट्रॅकिंग) करण्यासाठी जोरदार बाजू मांडली आहे. 2009 मध्ये कोपनहॅगन येथे झालेल्या जागतिक हवामान संम्मेलन, सी.ओ.पी15, मध्ये विकसित देशांनी विकसनशील देशांना हवामान बदलाच्या परिणामांचा सामना करण्यास मदत करण्यासाठी 2020 पर्यंत दरवर्षी यु.एस$100 एकत्रित करण्याचे वचन दिले होते. परंतु तब्बल 14 वर्षांनंतर सुद्धा हे उद्दिष्ट फक्त अंशत: पूर्ण झालेले आहे.

या पार्श्वभूमीवर, हवामान वित्तपुरवठा जलद गतीने मार्गनिरीक्षण (फास्ट-ट्रॅकिंग) करणे आणि हवामान वित्तपुरवठ्याची महत्त्वाकांक्षा वाढविणे या भारताच्या जी 20 अध्यक्षपदासाठी सर्वोच्च प्राथमिकता असतील. भारताच्या मते, विकसनशील देशांना त्यांच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी दरवर्षी यु.एस$100 च्या पातळीवरून हवामान वित्तपुरवठ्यात भक्कम वाढ केली पाहिजे आणि समृद्ध देशांनी संसाधनांच्या एकत्रीकरणाचे नेतृत्व केले पाहिजे.

या संदर्भात, नोव्हेंबर 2022 मध्ये बाली येथे झालेल्या जी 20 शिखर संम्मेलनाने विकसनशील देशांना हवामान वित्त पुरवठा जलद गतीने करण्यास सहमती दर्शविली आणि विकसनशील देशांना मदत करण्यासाठी दरवर्षी यु.एस$100 पासून हवामान वित्तपुरवठ्याच्या महत्त्वाकांक्षी न्यू कलेक्टिव्ह क्वांटिफाइड गोल (एन.सी.क्यू.जी) वर काम करण्यास सहमती दर्शविली.

आपल्या अध्यक्षतेखाली, भारत विकसित देशांना हवामान वित्तपुरवठ्याची मर्यादा दरवर्षी यु.एस$100 पर्यंत वाढविण्यास राजी करेल. नवीकरणीय ऊर्जेसह शून्य आणि कमी उत्सर्जन वीज निर्मितीची मांडणी वाढविण्यासाठी भारत जी 20 देशांसोबत काम करेल. भारतात होणाऱ्या जी 20 संम्मेलनामुळे तापमानवाढ 1.5 अंशांपर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा केली जात आहे.

भारत आणि इतर विकसनशील देशांच्या विजयात, बाली जाहीरनाम्यात शमन आणि अनुयोजन यांच्यातील समतोल साधण्याच्या संदर्भात, 2019 च्या पातळीवरून 2025 पर्यंत विकसनशील देशांसाठीची हवामान वित्तपुरवठ्याची सामूहिक तरतूद किमान दुप्पट करण्याचे आवाहन विकसित देशांना करण्यात आले आहे. भारताला समृद्ध देशांकडून हवामान वित्तपुरवठा, तंत्रज्ञान स्थानांतरण आणि गरीब व विकसनशील देशांची क्षमता बळकट करण्याच्या दृष्टीने ठोस कारवाईची अपेक्षा आहे जेणेकरून त्यांना हवामान बदलाचा सामना करता येईल.

हवामान संकटाची तीव्रता लक्षात घेता, कारवाईला अजून उशीर करून चालणार नाही. या संदर्भात, विकसित देशांना हवामान वित्तविषयक चर्चेसाठी राजी करण्याची मोठी जबाबदारी जी 20 वर आहे. आपल्या अध्यक्षतेखाली, भारत विकसित देशांवर हवामान बदल सौम्य करण्यासाठी विकसित देशांकडून आर्थिक, तांत्रिक आणि क्षमता वाढीसाठी मदत करण्याकरिता दबाव आणणार आहे. भारताच्या मते, विकसित देशांनी हरितगृह वायू उत्सर्जनाची ऐतिहासिक जबाबदारी लक्षात घेता, हवामान बदलाचा सामना करण्यासाठी संसाधनांची जमवाजमव करण्याचे नेतृत्व केले पाहिजे. अनुयोजन आणि शमन प्रकल्पांमध्ये निधीचे यथायोग्य वाटप झाले पाहिजे.

# अन्न सुरक्षेसाठी जी 20 कडून सहकार्य वाढविणे, कनिष्ठ तृणधान्ये (मिलेट्स) लोकप्रिय करणे

कोव्हिड-19 महामारी आणि त्यानंतरच्या रशिया-युक्रेन संकटानंतर पुरवठा साखळीतील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर, अन्न असुरक्षितता ही एक मोठी जागतिक चिंता बनली आहे आणि भारताच्या जी 20 अध्यक्षपदाच्या विषयपत्रिकेवर ठळकपणे असेल. अन्न संकटाचा परिणाम हा दोन्ही, विकसनशील आणि विकसित देशांवर होत असताना, भारत आपल्या जी 20 अध्यक्षपदाचा वापर करेल जेणेकरून उत्तर-दक्षिण विभागात (दरीत) आंतरराष्ट्रीय सहकार्य व मदत वाढवून जागतिक अन्न सुरक्षेला पाठबळ देता येईल. या बाबतीत भारताकडे आपल्या 1.3 बिलियन नागरिकांची अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्याची भक्कम क्षमता तर आहेच पण त्याशिवाय तो बऱ्याच विकसनशील देशांसाठी अन्न पुरवठादार म्हणून सुद्धा पाहायला मिळाला आहे. दक्षिण-दक्षिण सहकार्याच्या भावनेतून भारताने इतरांमध्ये अफगानिस्तानला 50,000 मेट्रिक टन गहू आणि औषधे व लसींचे अनेक भाग पाठवले होते, इंधन, जीवनावश्यक वस्तू आणि व्यापार समझोत्यासाठी श्रीलंकेला यु.एस$ 3.8 एवढे कर्ज दिले होते, म्यानमारला 10,000 मेट्रिक टन अन्नाची मदत आणि लसींचा पुरवठा केला होता.



महामारी व रशिया-युक्रेन संकटकाळ, अशा दुहेरी संकटामुळे जागतिक पुरवठा साखळी कोलमडत असल्याने भारत आपल्या जी 20 अध्यक्षपदाखाली खत आणि अन्नधान्य या दोन्हींची पुरवठा साखळी स्थिर आणि खात्रीशीर ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला संघटित करणार आहे. विशेष करून भारत खतांच्या अखंडित पुरवठ्याला प्राधान्य देईल. "आजची खतांची कमतरता हे उद्याचे अन्न संकट आहे आणि यावर जगाकडे तोडगा निघणार नाही", असे पंतप्रधान मोदी 15-16 नोव्हेंबर 2022 रोजी बाली येथे झालेल्या जी 20 शिखर संम्मेलनात म्हणाले.

जागतिक अन्न संकट कमी करण्यासाठी भारताने ब्लॅक सी ग्रेन इनिशिएटिव्हला पाठिंबा दिला आहे जेणेकरून जागतिक बाजारपेठेत रशियन अन्नपदार्थ व खत यांचा पुरवठा करता येईल. यामुळे युक्रेन आणि रशियन फेडरेशनकडून धान्य, अन्नपदार्थ आणि खते / निविष्ठांचे विनाअडथळा वितरण सुनिश्चित होईल जेणेकरून तणाव कमी होऊन विकसनशील देशांमधील जागतिक अन्न असुरक्षितता आणि उपासमार रोखली जाईल. या संदर्भात, भारत अन्न आणि खते याची निर्यातबंदी किंवा त्यावर निर्बंध घालण्याच्या विरोधात आहे.

जी 20 च्या अध्यक्षपदाच्या आपल्या कार्यकाळात, भारत आव्हानात्मक स्थितींमध्ये अन्न पुरवठा साखळी कार्यान्वित ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांना एकत्रित करण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे. भारताने सर्व गरजूंसाठी, विशेष करून जागतिक दक्षिणेतील देशांमध्ये अन्नाची आणि अन्न उत्पादनांची सुलभता, परडवण्याची क्षमता आणि शाश्वतता सुनिश्चित करून अन्न असुरक्षिततेवर मात करण्यासाठी एक अढळ वचनबद्धता दर्शविलेली आहे.

भारतासाठी, कृषी, अन्न तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञानात अधिक ताळमेळ (साहचर्य) निर्माण करण्यासाठी नवउपक्रमांना प्रोत्साहन देणे ही मुख्य प्राथमिकता असेल जेणेकरून अन्न आणि पोषण सुरक्षा सुधारता येईल.

आगामी काळात भारत शाश्वत अन्न सुरक्षा आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यावर भर देईल. हवामानास अनुकूल आणि नीटनेटकी (स्मार्ट) शेती हे अन्न सुरक्षेच्या क्षेत्रात भारताच्या आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रमुख वैशिष्ट्य असेल. अध्यक्षपदाच्या आपल्या कार्यकाळात भारत कनिष्ठ तृणधान्यांसारख्या (मिलेट्स सारख्या) पौष्टिक व पारंपारिक अन्नधान्यांना पुन्हा लोकप्रिय करेल. या संदर्भात, भारत आपल्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय कनिष्ठ तृणधान्यांचे (मिलेट्सचे) वर्ष मोठ्या उत्साहात साजरे करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करणार आहे.


अन्न सुरक्षा हे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक असल्याने जागतिक अन्न कार्यक्रमाला जी 20 देशांचा पाठिंबा महत्वपूर्ण असेल. भारताने "एक राष्ट्र एक रेशन कार्ड योजना" ही नागरिक-केंद्रित योजना सुरू केली आहे जेणेकरून सर्वांसाठी अन्न सुरक्षा सुनिश्चित करता येईल.

अन्नसुरक्षेच्या क्षेत्रात भारताने उल्लेखनीय कामगिरी केली आहे आणि यात जगातील सर्वात मोठ्या अन्न सुरक्षा उपक्रमाचा समावेश आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत (पीएमजीकेएवाय अंतर्गत) राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याखाली देण्यात येणाऱ्या नियमित मासिक अन्नधान्याव्यतिरिक्त भारत सरकारने प्रत्येक महिन्याला एका व्यक्तीमागे 5 किलो धान्य दिले. या योजनेमुळे कोरोनाव्हायरस महामारीचे प्रमाण त्याच्या उच्च बिंदूवर असताना 800 मिलियनपेक्षा अधिक भारतीयांना अन्न सुरक्षा दिली गेली होती. आय.एम.एफ ने भारतातील अत्यंत दारिद्र्य पातळीत होणारी वाढ रोखण्यासाठी या योजनेचे कौतुक केले आहे आणि ठळकरीत्या मांडले आहे की, अन्न हक्क दुप्पट केल्याने गरिबांना कोव्हिडमुळे उत्पन्नाच्या बाबतीत सहन कराव्या लागणाऱ्या धक्क्यांवर लक्षणीय कार्य त्याने केले आहे.

जागतिक अन्न सुरक्षा वाढविण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रसाराच्या दृष्टीने, जी 20 देशांच्या तुलनेत भारताकडे अफाट कृषी मनुष्यबळ असून याचा उपयोग अन्न उत्पादन वाढीसाठी करता येईल. याव्यतिरित, जागतिक अन्न सुरक्षा वाढविण्यात भारतीय कृषी क्षमतेला महत्त्वाची भूमिका बजावता येईल. जगातील काही देशांमध्ये चीज आणि ऑलिव्ह सारख्या पारंपारिक कृषी उत्पादनांना नवीन जीवन देण्यास भारतीय कृषी कौशल्यामुळे मदत झालेली आहे.

डिजिटल तंत्रज्ञान आणि कृषी तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये अधिक प्रगती होत असताना, शून्य-नांगरणे (झिरो-टिल) शेती, अचूक शेती, कंत्राटी शेती, ठिबक सिंचन यासारख्या रूढीवादी आणि कमी खर्चाच्या शेती तंत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि किफायतशीर दरात दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी भारताला आपले ज्ञान आणि तांत्रिक माहिती देण्याची संधी आहे.

उपासमार आणि कुपोषणाचा सामना करण्यासाठी शेतीला पर्यावरणदृष्ट्या अधिक शाश्वत करण्यासाठी जी 20 चे प्रयत्न वाढविणे महत्वाचे असेल. या संदर्भात, कीटकनाशके, तणनाशके आणि प्रदूषणापासून मुक्त असलेले विविध कृषी तंत्रज्ञान आणि पद्धती आत्मसात करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य केले पाहिजे जेणेकरून सकारात्मक, पोषण संबंधीचे परिणाम सुनिश्चित करता येतील.



# जागतिक वित्तीय प्रशासनाचे लोकशाहीकरण करणे : 21 व्या (एकविसाव्या) शतकातील वास्तवाशी जुळवून घेणे

दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेली जागतिक व्यवस्था दिवसेंदिवस आता वापरात नाही आणि मळगळलेली आहे. उदयोन्मुख संकटांना सामोरे जाण्याच्या जागतिक संस्थांच्या क्षमतेवर याने विपरीत प्रभाव पाडलेला आहे. या परिस्थितीत, जागतिक वित्तीय प्रशासन संस्थांना अधिक लोकशाहीवादी बनविणे आणि जागतिक व्यवस्थेत सुरू असलेल्या बदलांचे प्रतिनिधी बनविणे हे जी 20 च्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात भारताची मुख्य प्राथमिकता असणार आहे. जागतिक बँक आणि आय.एम. एफ सारख्या संस्था पाश्चिमात्य देशांचा बुरूज राहणार आहेत आणि उदयोन्मुख व विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व आणि वजन प्रदान केले पाहिजे ज्यामुळे त्यांना प्रासंगिक राहता येईल. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा उदय लक्षात घेता, विकास बँकांसह बहुपक्षीय संस्थांनी आणि आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा संस्थांनी त्वरित सुधारणा करण्याची गरज आहे. या पार्श्वभीवर, जागतिक प्रशासकीय संस्थांमध्ये जलद गतीने सुधारणा करणे हे भारताच्या जी 20 अध्यक्षपदाच्या दृष्टीने महत्त्वाची प्राथमिकता असणार आहे.

जीवनावश्यक वस्तूंचे संकट आणि जागतिक पुरवठा साखळी, युक्रेन संकटाच्या पार्श्वभूमीवर कोलमडल्याने, जागतिक प्रशासकीय सुधारणा जलदरित्या करणे अजूनच गरजेचे झाले आहे. बाली येथे झालेल्या जी 20 संम्मेलनात भाषण देताना पंतप्रधान मोदी यांनी या संकटाची व्याप्ती स्पष्टपणे मांडली आणि बहुपक्षीय संस्थांमध्ये सुधारणा करण्याची गरज ठळक करून मांडली. "प्रत्येक देशातील गरीब नागरिकांसमोरील आव्हान अधिक गंभीर आहे. दैनंदिन आयुष्यात ते आधीपासूनच संघर्ष करीत होते. त्यांच्यात दुहेरी संकटाला सामोरे जाण्याची आर्थिक क्षमता उरलेली नाही. दुहेरी संकटामुळे ते हाताळण्याची आर्थिक क्षमता त्यांच्यात नाही," असे ते म्हणाले. "या मुद्द्यांवर यु.एन सारख्या (संयुक्त राष्ट्रसंघासारख्या) बहुपक्षीय संस्था असफल झाल्या आहेत, हे मान्य करण्यास सुद्धा आपण कचरता कामा नये. आणि त्यात योग्य त्या सुधारणा करण्यात आपण सर्व असफल झालो आहोत", असे पंतप्रधान मोदी म्हणाले. भारताच्या मते, बहुपक्षीय संघटनांमध्ये सुधारणा केल्या गेल्या पाहिजेत जेणेकरून कोव्हिड नंतर जलद पूर्ववत स्थिती मिळविण्यासाठी चांगल्या जागतिक प्रशासनाची खात्री करता येईल.

सध्या आय.एम.एफ आणि जागतिक बँकेच्या प्रशासकीय रचनेत एक विशेष प्रशासकीय रचना आहे. मतदानाची शक्ती ही त्यांच्या सदस्य देशांच्या आर्थिक आकारावर अवलंबून असलेल्या बोर्डाद्वारे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवले जाते. यामुळे तीव्र असमानता निर्माण झालेली आहे: यु.एस सरकारची मतांची टक्केवारी 16% आहे, तर 100 मिलियन हून अधिक लोकसंख्या असलेल्या इथिओपिया सारखा देश आय.एम.एफ मधील केवळ 0.09% मतांवर नियंत्रण ठेवत आहे. जागतिक बँकेचे नेतृत्व नेहमीच यु.एस-अमेरिकन आणि आय.एम.एफ चे नेतृत्व एक युरोपियन करत असतो. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाच्या राजधानीत या दोन्ही संस्थांचे मुख्यालय असून उच्च उत्पन्न असलेल्या देशांतील अनेक अर्थतज्ज्ञ तेथे काम करत आहेत. विकसित देशांच्या बाजूने असलेली ही प्रशासकीय रचना आता तातडीने बदलली गेली पाहिजे.

भक्कम आणि परिणामकारी जागतिक वित्तीय सुरक्षा जाळं राखण्यासाठी भारत कटिबद्ध आहे आणि एक मजबूत, कोटावर आधारित आणि पुरेसे संसाधन असलेले आय.एम.एफ त्याच्या केंद्रस्थानी आहे. भारत 15 डिसेंबर 2023 पर्यंत कोट्याच्या 16 व्या सामान्य पुनरावलोकनाअंतर्गत आय.एम.एफ प्रशासन सुधारणांची प्रक्रिया पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहील, ज्यात मार्गदर्शक म्हणून नवीन कोटा सूत्र (फॉर्म्युला) सामील आहे. जी 20 देशांनी आंतरराष्ट्रीय वित्तीय रचनेची दीर्घकालीन आर्थिक लवचिकता बळकट करण्यासाठी काम करणे अपेक्षित आहे आणि यात शाश्वत भांडवली प्रवाहास प्रोत्साहन देणे आणि स्थानिक चलन भांडवली बाजार विकसित करणे यांचा समावेश आहे.

भारताचा जागतिक प्रशासनात सुधारणा करण्याचा दृष्टिकोन सुधारित बहुपक्षीयतेच्या संकल्पनेने प्रेरित आहे आणि हे दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे ब्रिक्स शिखर संम्मेलन 2018 मधील लीडर्स रिट्रीटमध्ये पंतप्रधान मोदी यांनी प्रथम स्पष्टपणे व्यक्त केले होते. समकालीन वास्तव न दर्शविणाऱ्या बहुपक्षीय संस्थांच्या सुधारणांना चालना देणे आणि इतर प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना प्रशासनात अधिक आवाज देणे ही यामागची कल्पना होती. या कल्पनेच्या अनुषंगाने भारत आर्थिक आणि राजकीय अशा जागतिक प्रशासकीय रचनेत सुधारणा करण्याची सातत्याने बाजू मांडत आहे आणि हे जी 20 सह भिन्न जागतिक सभाचौकांमध्ये करत आहे. अनेक अर्थांनी जी 20 हा सर्वात प्रातिनिधिक बहुपक्षीय गट आहे ज्यात दोन्ही विकसित देश आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा समावेश आहे आणि म्हणूनच बहुपक्षीय संस्था आणि बँकांमध्ये सुधारणा करण्यासाठी सर्वोत्तमरित्या सुसज्ज आहे. 2025 पर्यंत जी 20 चे अध्यक्षपद विकसनशील देशांकडे आहे जसे की - 2022 मध्ये इंडोनेशियाकडे, 2023 मध्ये भारताकडे, 2024 मध्ये ब्राझीलकडे आणि 2025 मध्ये दक्षिण आफ्रिकाकडे - आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची आणि साध्य करण्याची ही योग्य वेळ आहे. आंतरराष्ट्रीय प्रशासन संस्थांमध्ये जागतिक दक्षिणेचा जास्त प्रमाणात सहभाग वाढविण्यासाठी भारताचे जी 20 अध्यक्षपद ही एक असाधारण संधी आहे.

या दृष्टीने जागतिक वित्तीय प्रशासनात धाडसी नवउपक्रम आणण्याची नितांत गरज आहे. यापुढे 21व्या (एकविसाव्या) शतकात ब्रेटन वुड्स संस्था हेतू साध्य करणार नाही आणि नवीन भू-आर्थिक वास्तवाचे प्रतिनिधित्व करणार यावर सर्वसामान्य मत वाढत आहे. बहुपक्षीय वित्तीय संस्थांचा कायदेशीरपणा वाढविणे हे फक्त जगाच्याच नव्हे तर आय.एम.एफ आणि जागतिक बँकेच्या प्रमुख भागधारकांच्याही हिताचे आहे.




# एस.डी.जी चा वेग वाढविणे : जगाला राहण्यासाठी एक चांगले ठिकाण बनविणे

संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकास विषयपत्रिका 2030 (युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट अजेंडा 2030) याच्या यशाची पूर्तता करण्याची वेळ जवळ येत असताना, एस.डी.जी चा वेग वाढविणे अत्यंत गरजेचे बनले आहे. दुर्दैवाने कोव्हिड-19, युक्रेन-रशिया युद्ध, असमान आर्थिक विकास दर आणि उच्च महागाईमुळे एस.डी.जी ची प्रगती मंदावली आहे. बाली येथे झालेल्या जी 20 संम्मेलनाच्या संदर्भात, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी जी 20 नेत्यांना एस.डी.जी च्या 'एस.ओ.एस' ला प्रतिसाद देण्याचे आणि हवामान संकटाचा सामना करण्यासाठी, दुष्काळ आणि उपासमार रोखण्यासाठी, ऊर्जेचे अवस्थांतर करण्याला आणि डिजिटल परिवर्तनास प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक दक्षिणेतील सरकारांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

या पार्श्वभूमीवर, भारत आपल्या जी 20 अध्यक्षपदाच्या कार्यकाळात एस.डी.जी च्या प्रगतीचा वेग वाढविण्यावर भर देणार आहे. एस.डी.जी मध्ये परस्परांशी संबंधित मुद्द्यांचा समावेश आहे, जसे की, दारिद्य, अन्न आणि पोषणसंबंधी सुरक्षा, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार आणि हवामान बदल.

शाश्वत विकास लक्ष्ये (एस.डी.जी) किंवा जागतिक उद्दिष्टांमध्ये 17 परस्परसंलग्न उद्दिष्टांचा समावेश आहे जे "सध्या आणि भविष्यात, लोकांसाठी आणि पृथ्वीसाठी शांतता आणि समृद्धीसाठी वाटून घेतलेले ब्लूप्रिंट" म्हणून रचले गेले आहेत. संयुक्त राष्ट्रमहासभेने (यु.एन-जी.ए ने) 2015 मध्ये एस.डी.जी ची स्थापना केली होती आणि 2030 विषयपत्रिका (अजेंडा) अशा नावाच्या यु.एन-जी.ए ठरावात त्यांचा समावेश आहे. दारिद्य नाही, शून्य उपासमार, चांगले आरोग्य आणि कल्याण, दर्जेदार शिक्षण, लैंगिक समानता, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा, सभ्य काम आणि आर्थिक विकास, उद्योग, नवउपक्रम आणि पायाभूत सुविधा, कमी असमानता, शाश्वत शहरे आणि समुदाय, जबाबदार वापर आणि उत्पादन, हवामान कृती, पाण्याखालचे जीवन, जमिनीवरील जीवन, शांतता, न्याय आणि मजबूत संस्था, उद्दिष्टांसाठी भागीदारी - असे 17 एस.डी.जी आहेत.

एस.डी.जी हे भारताच्या विकासाच्या विषयपत्रिकेचा आणि एकमेकांशी जोडलेल्या जगावरील विश्वासाचा अविभाज्य भाग आहे, जे भारताच्या जी 20 अध्यक्षपदाला चैतन्य देणाऱ्या "वसुदैव कुटुंबकम्" या सामाजिक भावनिष्ठेत दर्शविलेले आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांची विषयपत्रिका (युनायटेड नेशन्स अजेंडा) 2030 तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आणि शाश्वत विकास लक्ष्यांमध्ये (एस.डी.जी मध्ये) देशाच्या राष्ट्रीय विकासाची बरीचशी विषयपत्रिका प्रतिबिंबित झाली आहे (राष्ट्रीय विकास अजेंडा प्रतिबिंबित झाला आहे). या अर्थाने, शाश्वत विकास लक्ष्यांची पूर्तता करण्यासाठी मुख्यतः भारताच्या प्रगतीवर जगाची प्रगती अवलंबून आहे.

भारताच्या प्रयत्नांचा केंद्रबिंदू हा खास करून अल्पविकसित देशांसाठी (एल.डी.सी साठी) आणि लहान बेट विकसनशील राज्यांसाठी (एस.आय.डी.एस साठी) एस.डी.जी च्या वित्तपुरवठ्यात वाढ करण्यावर आणि त्यात विविधता आणण्यावर असेल. या संदर्भात जागतिक बँक, आय.एम.एफ आणि डब्ल्यू.टी.ओ सारख्या बहुपक्षीय संस्थांची पुनर्रचना करून एस.डी.जी वित्तपुरवठा वाढविण्याच्या गरजेवर विकसनशील देशांमध्ये सर्वानुमत होत आहे. भारत खाजगी क्षेत्रासाठी सक्रियपणे आर्थिक प्रवाह वाढवून एस.डी.जी चा वेग वाढविण्यात मोठी भूमिका बजावत आहे. एस.डी.जी च्या यशाला पाठबळ

देण्यासाठी खाजगी गुंतवणूक गोळा करण्यासह नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा स्त्रोतांच्या आणि साधनांच्या माध्यमातून भारत कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांसाठी पुढील गुंतवणुकीसाठी पाठिंबा देत आहे.

एस.डी.जी चे जलद गतीने मार्गनिरीक्षण (फास्ट-ट्रॅकिंग) अत्यावश्यक बनलेले आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार संम्मेलनाच्या नव्या कार्यपत्रिकेनुसार, जी 20 देशांमध्ये भारत उठून दिसत आहे, कारण 2015 ते 2019 या कालावधीत त्याने सर्वाधिक वेगाने वाढ नोंदविलेली आहे आणि तो कमी-मध्यम उत्पन्न असलेल्या देशांच्या तुलनेत सुद्धा वेगाने प्रगती करत आहे.

पुढे पाहिल्यास, जी 20 च्या अध्यक्षतेच्या कार्यकाळात भारत हा आंतरराष्ट्रीय विकास वित्त संस्थांकडून (डी.एफ.आय कडून) वाढलेले सार्वभौम (सरकारी) कर्ज; आणि मोठ्या प्रमाणात कर्ज घेतलेल्यांसाठी कर्जाची पुनर्रचना यांच्यासह विविध मार्गांनी एस.डी.जी करिता वित्तपुरवठा वाढविण्यासाठी प्रगत आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांसोबत खांद्याला खांदा लावून काम करणार आहे. सार्वजनिक गुंतवणूक आणि संरचनात्मक सुधारणांना चालना देणे, खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे आणि बहुपक्षीय व्यापार व जागतिक पुरवठा साखळीची लवचिकता मजबूत करण्यावर सुद्धा भारत भर देणार आहे, जेणेकरून दीर्घकालीन वाढीला पाठबळ देता येईल आणि ती शाश्वत व सर्वसमावेशक व हरित बनविता येईल.

भारत जी 20 बैठकांमध्ये देशाची काही उपलब्धी दाखविणार आहे आणि इतर देशांमधील अनुभव आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करण्यावर भर देणार आहे. एस.डी.जी चा वेग वाढविणे हा सर्वसमावेशक आणि समृद्ध ग्रहाची निर्मिती करण्याच्या भारताच्या दृष्टीकोनाचा एक भाग आहे, जेणेकरून ते राहण्यासाठी एक चांगले ठिकाण बनेल.

# शब्दावली

**ए.सी.टी-एक्सेलेरेटर:** ॲक्सेस टू कोव्हिड-19 टूल्स (ए.सी.टी) एक्सीलरेटर हे कोव्हिड-19 चाचण्या, उपचार आणि लसींच्या विकास, उत्पादन आणि समान उपलब्धता यांचा वेग वाढविण्यासाठी जागतिक सहकार्याची एक महत्त्वपूर्ण चौकट आहे.

**अदीस अबाबा ॲकशन अजेंडा (ए.ए.ए.ए.ए/अ.अ.अ.अ):** ए.ए.ए.ए.ए/अ.अ.अ.अ शाश्वत विकासासाठी 2030 विषयपत्रिकेच्या अंमलबजावणीस समर्थन देण्यासाठी एक भरभक्कम पाया स्थापित करते. आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय प्राथमिकतांशी सर्व वित्तपुरवठा आणि धोरणांची सांगड घालून शाश्वत विकासासाठी वित्तपुरवठा करण्यासाठी एक नवीन जागतिक चौकट प्रदान करते.

**कृषी बाजार माहिती प्रणाली (ॲग्रीकल्चर मार्केट इन्फॉर्मेशन सिस्टम) (ए.एम.आय.एस):** कृषी बाजार माहिती प्रणाली (ॲग्रीकल्चर मार्केट इन्फॉर्मेशन सिस्टम) (ए.एम.आय.एस) हे खाद्य पदार्थांच्या संबंधित बाजारातील पारदर्शकता वाढविण्यासाठी आणि संकटाच्या काळात आंतरराष्ट्रीय धोरण समन्वयास प्रोत्साहित करण्यासाठी एक आंतर-एजन्सी व्यासपीठ आहे. जी 20 फ्रान्सच्या अध्यक्षपदाच्या काळात याची स्थापना झाली. गहू, मका, तांदूळ, सोयाबीन या पिकांचा या उपक्रमात समावेश आहे.

**ॲग्रो-फूड ग्लोबल व्हॅल्यू चेन:** ते अन्न आणि फायबरच्या उत्पादकांना जगभरातील ग्राहकांशी जोडतात आणि ग्राहकांना अधिक पर्यायांसह अन्नाचा स्थिर पुरवठा करण्यास मदत करतात आणि त्याच वेळी उत्पादकांसाठी उत्पन्न निर्माण करतात.

**अंटार्क्टिक ट्रीटी सिस्टम:** अंटार्क्टिक संधी प्रणाली अंटार्क्टिकच्या राज्यांमधील संबंधांचे नियमन करण्यासाठी तयार केलेल्या गुंतागुंतीच्या व्यवस्थांचा एक संच आहे. वॉशिंग्टन डी.सी मध्ये 1 डिसेंबर 1959 रोजी स्वाक्षरी झालेल्या आणि 23 जून 1961 रोजी अंमलात आलेले स्वाक्षरी झालेल्या प्रणालीच्या केंद्रस्थानी अंटार्क्टिक संधी आहे.

**अंताल्या युवा लक्ष्य:** अंताल्या युवा लक्ष्य 2015 मध्ये तुर्कीच्या अंताल्या येथे जी 20 देशांनी मान्य केलेल्या ध्येयाचा संदर्भ देते "आपआपल्या देशात 2025 पर्यंत कामगार बाजारपेठेत कायमस्वरूपी मागे राहण्याचा धोका असलेल्या त्यांच्या देशातील तरुण लोकांचा हिस्सा 15% ने कमी करणे.

**बेस इरोजन आणि प्रॉफिट शिफ्टिंग (बी.इ.पी.एस):** बी.इ.पी.एस म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी (एम.एन.इ नी) कर देयके टाळण्यासाठी विविध अर्थव्यवस्थांमधील कर नियम आणि नियमांमधील तफावत आणि असमानतांचा फायदा घेण्यासाठी अवलंबलेली कर नियोजन धोरणे.

**वर्तुळाकार अर्थव्यवस्था:** अर्थव्यवस्थेत उत्पादने रद्द (स्क्रॅप) करण्याऐवजी आणि नवीन संसाधनांचे शोषण करण्याऐवजी त्यांच्या पुनर्वापरास प्रोत्साहित करणाऱ्या बाजारपेठांचा समावेश आहे. या अर्थव्यवस्थेत कपडे, भंगार धातू आणि जुनाट इलेक्ट्रॉनिक्स अशा सर्व प्रकारचा कचरा अर्थव्यवस्थेत परत आणला जातो किंवा अधिक कार्यक्षमतेने वापरला जातो.

**कॉम्पॅक्ट विथ आफ्रिका (सी.डब्ल्यू.ए):** पायाभूत सुविधा क्षेत्रांसह आफ्रिकेतील खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी जर्मन जी 20 अध्यक्षपदाच्या अंतर्गत सी.डब्ल्यू.ए ची सुरुवात करण्यात आली. बृहत (मॅक्रो), व्यवसाय आणि आर्थिक चौकटीमध्ये लक्षणीय सुधारणा करून आफ्रिकन अर्थव्यवस्थांमध्ये खाजगी गुंतवणुकीचे आकर्षण वाढविणे हे सी.डब्ल्यू.ए चे मुख्य उद्दीष्ट आहे.

**कोव्हॅक्स:** कोव्हॅक्स हा ए.सी.टी-एक्सीलरेटरचा लसींचा आधारस्तंभ आहे. कोव्हॅक्सचे उद्दीष्ट कोव्हिड-19 लसींच्या विकास आणि उत्पादनास गती देणे आणि जगातील प्रत्येक देशाला योग्य आणि समप्रमाणात उपलब्धतेची हमी देणे आहे.

**पर्यावरण वित्त (क्लायमेट फायनान्स):** पर्यावरण वित्त (क्लायमेट फायनान्स) सार्वजनिक, खाजगी आणि पर्यायी स्त्रोतांकडून स्थानिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय निधी आहे जो हवामान बदल कमी करणे आणि अनुयोजन कृतींना समर्थन देण्याचा प्रयत्न करतो. हवामान बदलाशी जुळवून घेत उत्सर्जन रोखण्यासाठी विकसनशील देशांना मदत करण्याकरिता विकसित देशांनी हवामान वित्त पुरवठ्यासाठी दरवर्षी यु.एस$100 बिलियन जमा करण्याचे मान्य केले.

**कॉर्पोरेट गव्हर्नन्स:** आर्थिक कार्यक्षमता, शाश्वत विकास आणि वित्तीय स्थैर्य यास समर्थन देण्याच्या दृष्टीकोनातून कॉर्पोरेट गव्हर्नन्ससाठी कायदेशीर, नियामक आणि संस्थात्मक चौकटीचे मूल्यांकन आणि सुधारणा करण्यास धोरणकर्त्यांना मदत करते.

**भ्रष्टाचारावरील चांगल्या पद्धतींचे संकलन:** भ्रष्टाचाराच्या जोखमीच्या पातळीचे मोजमाप आणि भ्रष्टाचारविरोधी धोरणांच्या परिणामकारकतेचे मोजमाप यावर भ्रष्टाचाराचे मोजमाप (वैध, विश्वासार्ह, कृतीकरण्यायोग्य इत्यादी) करण्यासाठी राष्ट्रीय अनुभवांवर लक्ष केंद्रित केले आहे.

**कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन आणि स्टोरेज (सी.सी.यू.एस):** सी.सी.यू.एस म्हणजे जागतिक ऊर्जा आणि हवामान उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विविध भूमिका बजावू शकणाऱ्या तंत्रज्ञानाचा संच. कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनाची नोंद ठेवून त्याचा वापर करून अशा गोष्टी बनवणे जसे की बांधकाम साहित्य किंवा ते हजारो फूट खाली कायमस्वरूपी साठविणे अशी ही प्रक्रिया आहे.

**कॉमन रिपोर्टिंग स्टँडर्ड (सी.आर.एस):** करचुकवेगिरी रोखण्यासाठी भागीदार देशांमध्ये माहितीची स्वयंचलित देवाणघेवाण करण्यासाठी ओ.इ.सी.डी ने 2014 मध्ये सी.आर.एस विकसित केले आहे. हे प्रत्येक देशाला लागू होते ज्याने सी.आर.एस साठी वचनबद्ध केले आहे आणि त्याचे कायद्यात रूपांतरण केले आहे.

**डेटा गॅप्स इनिशिएटिव्ह (डी.जी.आय):** डेटा गॅप्स इनिशिएटिव्ह (डी.जी.आय) चे दोन टप्पे 2009 मध्ये जी 20 च्या विनंतीला प्रतिसाद म्हणून सुरू करण्यात आले होते. डेटा गॅप्स इनिशिएटिव्ह (डी.जी.आय-1: 2009-15) च्या पहिल्या टप्प्यात वैचारिक चौकटींच्या विकासावर तसेच काही सांख्यिकीय संकलन आणि अहवालात वाढ करण्यावर भर देण्यात आला. डी.जी.आय-2 (2015-21) चे मुख्य उद्दीष्ट धोरणांच्या वापरासाठी विश्वसनीय आणि वेळेवर आकडेवारीचे नियमित संकलन आणि प्रसार कार्यान्वित करणे होते.

**डेट सर्व्हिस सस्पेंशन इनिशिएटिव्ह (डी.एस.एस.आय):** 2020 मध्ये जी 20 ने सुरू केलेल्या डी.एस.एस.आय ने जगातील सर्वात गरीब देशांना मर्यादित कालावधीसाठी त्यांचे कर्ज सेवा देयके स्थगित करण्याची आणि महामारी व त्याच्या परिणामांचा सामना करण्यासाठी त्यांना आर्थिक सवलत प्रदान करण्याचा प्रस्ताव दिला.

**आपत्ती लवचिकता:** विकासाच्या दीर्घकालीन शक्यतांशी तडजोड न करता धोके, धक्के किंवा ताणतणावांशी जुळवून घेण्याची आणि त्यातून सावरण्याची व्यक्ती, समुदाय, संस्था आणि राज्यांमध्ये क्षमता असणे.

**आपत्ती रोधक पायाभूत सुविधा:** यात महत्त्वपूर्ण इमारती, सार्वजनिक सामुदायिक सुविधा, वाहतूक व्यवस्था, दूरसंचार आणि वीज प्रणालींचा समावेश आहे जे पूर, भूकंप किंवा वणवा सारख्या नैसर्गिक आपत्तीच्या प्रभावाचा सामना करण्यासाठी धोरणात्मकरित्या रचले गेले आहेत.

**एम्पॉवर अलायन्स:** एम्पॉवर ही खाजगी क्षेत्राच्या नेतृत्वाखालील आघाडी आहे ज्याचे उद्दीष्ट खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांमधील वाढीव सहकाऱ्याद्वारे महिलांना मिळणाऱ्या संधींमधली सुलभता सुधारणे आहे. आर्थिक उपक्रमांमध्ये महिलांच्या सहभागात अडथळे आणणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

**फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स (एफ.ए.टी.एफ):** एफ.ए.टी.एफ ही एक आंतर-सरकारी संस्था आहे जी जागतिक मनी लॉँड्रिंग आणि दहशतवादाला वित्तपुरवठा रोखण्याच्या दृष्टीने काम करते. ही मनी लॉँड्रिंग आणि दहशतवादाला वित्तपुरवठा रोखण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय मानके प्रस्थापित करण्याचे काम करते.

**फायनान्शियल स्टॅबिलिटी बोर्ड (एफ.एस.बी):** एफ.एस.बी ही जागतिक वित्तीय व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी आणि शिफारसी करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थैर्याला चालना देणे हे एफ.एस.बी चे एक प्रमुख लक्ष्य आहे.

**खाद्य संयोग:** खाद्य संयोग हे एकाधिक भागधारकांचे व्यासपीठ आहे. कृषी खाद्य प्रणाली परिवर्तनाच्या दिशेने कार्य करणे आणि बदलाचा वेग वाढविणे आणि गरजू देशांसाठी युती आणि सामूहिक समर्थन तयार करणे हे त्याचे उद्दीष्ट आहे. वाढती अन्न असुरक्षितता, हवामानाचे धक्के तीव्र होणे आणि जागतिक अन्न आणि शेतीसाठी अस्थिरता या जागतिक प्राधान्यक्रमांना प्रतिसाद देण्याचे काम ही संस्था करते.

**कामाचे भवितव्य:** तांत्रिक, पिढीगत आणि सामाजिक बदलांमुळे प्रभावित होऊन पुढील दशकात काम करण्याच्या पद्धतीत होणारे बदल हे कामाचे भवितव्य सांगते.

**जी 20 इनोव्हेशन लीग:** 2021 मध्ये इटलीच्या जी 20 अध्यक्षतेखाली सुरू झालेली जी 20 इनोव्हेशन लीग नाविन्यपूर्ण आणि तंत्रज्ञानातील आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आणि जगातील सर्वात महत्वाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांमधील सहकार्य वाढवते.

**जी 20 पाण्याचे व्यासपीठ:** 2021 मध्ये सुरू केलेले आणि सौदी अरेबियाने कार्यान्वित केलेले जी 20 वॉटर प्लॅटफॉर्म जगभरातील शाश्वत जल व्यवस्थापनावरील अनुभव सामायिक करण्यासाठी एक डिजिटल साधन आहे.

**ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर हब (जी.आय हब):** 2014 मध्ये जी 20 ने स्थापन केलेली जी.आय हब ही कृती-आधारित कार्यक्रमांद्वारे शाश्वत, लवचिक आणि सर्वसमावेशक पायाभूत सुविधांचे वितरण पुढे नेणारी एक नफा न करणारी संस्था आहे. हे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांशी सहकार्य करते आणि ज्ञान एकमेकांना सांगण्याचे केंद्र म्हणून कार्य करते.

**ग्लोबल पार्टनरशिप फॉर फायनान्शियल इन्क्लुजन (जी.पी.एफ.आय):** दक्षिण कोरियातील सोल येथे 10 डिसेंबर 2010 रोजी अधिकृतपणे सुरू करण्यात आलेले जी.पी.एफ.आय हे जी 20 देश आणि जी 20 नसलेले देश आणि इतर भागधारकांसाठी सहकारी शिक्षण, ज्ञान वाटणे, धोरणांची वकिली (ॲडव्होकेसी) आणि समन्वयाद्वारे वित्तीय समावेशनाच्या मुद्द्यावर काम करण्यासाठी एक सर्वसमावेशक व्यासपीठ आहे.

**ग्लोबल पब्लिक गुड्स (जी.पी.जी):** जी.पी.जी म्हणजे अशा वस्तू किंवा सेवा ज्याचा फायदा जगातील सर्व नागरिकांना होतो. आपले नैसर्गिक वातावरण, इतिहास आणि संस्कृती व तांत्रिक प्रगतीपासून मेट्रिक प्रणालीसारख्या दैनंदिन उपयोगिता प्रणालीपर्यंत ते आपल्या जीवनाच्या विविध पैलूंवर परिणाम करतात.

**ग्लोबल फोरम ऑन स्टील ॲक्ससेस कॅपॅसिटी (जी.एफ.एस.इ.सी):** जी.एफ.एस.इ.सी हे अतिरिक्त क्षमतेच्या आव्हानावर चर्चा करण्यासाठी आणि सामूहिक उपाय शोधण्यासाठी आणि पोलाद क्षेत्रातील बाजारपेठेचे कामकाज वाढविण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे. 2016 मध्ये जी 20 हांगझोऊ संम्मेलनात जी 20 नेत्यांनी वैश्विक मंचाची (फोरमची) निर्मिती केली होती. वैश्विक फोरम हे जी 20 चे सर्व सदस्य आणि ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट (ओ.इ.सी.डी) च्या इच्छुक सदस्यांसाठी एक खुले व्यासपीठ आहे.

**ग्लोबल फायनान्शियल सेफ्टी नेट (जी.एफ.एस.एन):** जी.एफ.एस.एन ची व्यापक व्याख्या संस्थात्मक व्यवस्थेचा एक संच म्हणून केली जाऊ शकते जे संभाव्य धक्क्यांविरूद्ध संकट निवारणासाठी विमा किंवा निधीची आवश्यकता असलेल्या देशांना आर्थिक संसाधने प्रदान करते. संकटात सापडलेल्या देशाला स्व-वित्तपुरवठ्याची मर्यादा पूर्ववत करण्यास मदत करणे आणि योग्य अटींद्वारे देशांतर्गत धोरणातील अपयश सुधारणे हे या व्यवस्थेचे उद्दीष्ट आहे.

**ग्रीन फायनान्स:** ग्रीन फायनान्स म्हणजे पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत असलेल्या प्रकल्पांसाठी किंवा हवामानात बदल न होऊ देणारे प्रकल्प यांच्या वापरासाठी विशिष्ट असलेली वित्तीय व्यवस्था.

**ग्रीन रिकव्हरी:** ग्रीन रिकव्हरी धोरणे आणि उपायांवर लक्ष केंद्रित करते जे लोकांना आणि पृथ्वीला पुढील वर्षांसाठी फायदेशीर ठरेल. यामुळे आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीला चालना देतानाच देशांची पुनर्बांधणी अधिक चांगली होऊ शकेल .

**आर्थिक आणि वित्तीय सांख्यिकीवरील आंतर-एजन्सी गट (आय.ए.जी):** 2008 मध्ये स्थापित, आय.ए.जी ची मुख्य भूमिका वित्तीय क्षेत्रासाठी सांख्यिकी आणि डेटामधील फरकाशी संबंधित मुद्द्यांचे समन्वय आणि देखरेख करणे आहे. आय.ए.जी मध्ये बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट (बी.आय.एस), युरोपियन सेंट्रल बँक (ई.सी.बी), युरोस्टॅट, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आय.एम.एफ), ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट (ओ.इ.सी.डी), संयुक्त राष्ट्र संघ (यु.एन) आणि विश्व बँक सामील आहेत.

**इंटरनॅशनल एनर्जी फोरम (आय.ई.एफ):** आय.ई.एफ ही 71 देशांच्या ऊर्जा मंत्र्यांची जगातील अग्रगण्य आंतरराष्ट्रीय संघटना आहे. यात ऊर्जा उत्पादक आणि वापरणारे दोन्ही देश आणि ऊर्जेच्या मुद्द्यांवर चर्चेसाठी एक महत्त्वाचे जागतिक व्यासपीठ आहे.

**इललीगल, अनरिपोर्टेड आणि अनरेगुलेटेड (आय.यू.यू) फिशिंग:** ही एक व्यापक संज्ञा आहे जी विविध प्रकारच्या मासेमारीच्या क्रियाकलापांची नोंद ठेवते. बेकायदेशीर, नोंद न झालेले आणि अनियंत्रित मासेमारी क्रियाकलाप राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मासेमारीच्या नियमांचे उल्लंघन करतात. आय.यू.यू मासेमारी ही एक वैश्विक समस्या आहे जी सागरी परिसंस्था आणि शाश्वत मासेमारीला धोका निर्माण करते.

**आंतरराष्ट्रीय मिथेन उत्सर्जन वेधशाळा (आय.एम.ई.ओ):** मिथेन उत्सर्जनात लक्षणीय बदल घडवून आणण्यासाठी संयुक्त राष्ट्रपर्यावरण कार्यक्रमाने (यु.एन.इ.पी) आय.एम.इ.ओ हा डेटा-आधारित आणि कृती-उन्मुख उपक्रम आहे.

**जैवविविधता आणि परिसंस्था सेवांवरील आंतरसरकारी विज्ञान-धोरण व्यासपीठ (आय.पी.बी.इ.एस):** आय.पी.बी.इ.एस जागतिक स्तरावर जैवविविधता आणि परिसंस्था सेवा आणि त्यांच्या परस्परसंबंधांवरील ज्ञानाचे नियमित आणि वेळेवर मूल्यांकन करण्यासाठी आहे. जपान जी 20 अध्यक्षतेखाली आय.पी.बी.इ.एस ची सुरुवात करण्यात आली होती.

**जस्ट ट्रान्झिशन:** जस्ट ट्रान्झिशन म्हणजे अर्थव्यवस्थेला शक्य तितक्या न्याय्य आणि सर्वसमावेशक अशा प्रकारे हरित करणे, कामाच्या चांगल्या संधी निर्माण करणे आणि कोणालाही त्रास न देणे.

**मनी मार्केट फंड:** मनी मार्केट फंड हा एक प्रकारचा म्युच्युअल फंड आहे जो अत्यंत लिक्विड, नियर टर्म इन्स्ट्रुमेंट्स मध्ये गुंतवणूक करतो. या इन्स्ट्रुमेंट्समध्ये रोख रक्कम, रोख समतुल्य सिक्युरिटीज आणि उच्च-क्रेडिट-रेटिंग, अल्प-मुदतीच्या कर्ज-आधारित सिक्युरिटीजचा समावेश आहे.

**बहुपक्षीय विकास बँका (एम.डी.बी):** एम.डी.बी विकसनशील देशांमध्ये आर्थिक आणि सामाजिक विकासास प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आहेत. जागतिक बँक, एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी), युरोपियन बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट (इ.बी.आर.डी), इंटर-अमेरिकन डेव्हलपमेंट बँक (आय.ए.डी.बी) आणि आफ्रिकन डेव्हलपमेंट बँक (ए.एफ.डी.बी) हे सर्वात महत्त्वाचे एम.डी.बी आहेत.

**नॉन-बँक फायनान्शियल इन्स्टिट्यूशन (एन.बी.एफ.आय):** एन.बी.एफ.आय ही एक वित्तीय संस्था आहे ज्याकडे पूर्ण बँकिंग परवाना नाही आणि जनतेकडून ठेवी स्वीकारू शकत नाही. तथापि, एन.बी.एफ.आय गुंतवणूक (सामूहिक आणि वैयक्तिक दोन्ही), जोखीम पूलिंग, आर्थिक सल्लामसलत, दलाली, पैश्याचे हस्तांतरण आणि चेक वटवणे यासारख्या वैकल्पिक वित्तीय सेवांची सुविधा देतात.

**ओ.इ.सी.डी लाचलुचपत प्रतिबंधक करार:** ओ.इ.सी.डी लाचलुचपत प्रतिबंधक करार, ज्याला आंतरराष्ट्रीय व्यावसायिक व्यवहारांमध्ये परदेशी सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या लाचखोरीचा सामना करण्यासाठी कन्व्हेन्शन देखील म्हणतात, हे कायदेशीररित्या बंधनकारक आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी साधन आहे जे लाच व्यवहाराच्या "पुरवठ्याच्या बाजू" वर लक्ष केंद्रित करते (व्यक्ती किंवा संस्था लाच देणारी, आश्वासन देणारी किंवा प्रत्यक्ष लाच देणारी). अधिवेशनातील पक्षकारांच्या कायद्यानुसार लाच घेणे हा फौजदारी गुन्हा मानला जातो.

**वन हेल्थ:** 'वन हेल्थ' हा लोकं, प्राणी आणि पर्यावरणाच्या आरोग्याचा समतोल राखण्यासाठी आणि अनुकुलीत करण्यासाठी , एकात्मिक दृष्टिकोन आहे. विशेषत: कोव्हिड-19 महामारीसारख्या जागतिक आरोग्यविषयक समस्यांना प्रतिबंध करणे, भविष्यवाणी करणे, शोधणे आणि प्रतिसाद देणे महत्वाचे आहे.

**ओसाका ब्लू ओशन व्हिजन:** 2019 मध्ये जपानच्या जी 20 अध्यक्षतेखाली स्वीकारलेले ओसाका ब्लू ओशन व्हिजन हे "सागरी प्लास्टिक कचऱ्यामुळे अतिरिक्त प्रदूषण कमी करण्यासाठी जी 20 देशांनी सर्वसमावेशक जीवन-चक्र दृष्टिकोनाद्वारे 2050 पर्यंत शून्यापर्यंत आणण्यासाठी स्वेच्छेने दिलेली वचनबद्धता आहे".

**पॅरिस करार:** पॅरिस करार हा हवामान बदलावरील कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आंतरराष्ट्रीय करार आहे. हा करार 12 डिसेंबर 2015 रोजी स्वीकारण्यात आला आणि 4 नोव्हेंबर 2016 रोजी अंमलात आला. या करारात जागतिक तापमानवाढीला औद्योगिकपूर्व पातळीच्या तुलनेत 1.5 अंश सेल्सिअसऐवजी 2 अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**पॅरिस क्लब:** पॅरिस क्लब हा अधिकृत कर्जदार देशांचा एक प्रमुख आंतर-सरकारी गट आहे. अनौपचारिक स्वरूपाचा हा गट कर्जदार देशांना भेडसावणाऱ्या देयकाशी संबंधित समस्यांवर कार्यक्षम उपाय शोधण्याचा प्रयत्न करतो.

**दारिद्र्य निर्मूलन आणि विकास ट्रस्ट (पी.आर.जी.टी):** पी.आर.जी.टी च्या माध्यमातून आय.एम.एफ कमी उत्पन्न असलेल्या देशांना सवलतीच्या दरात आर्थिक मदत पुरवते.

**आफ्रिकेतील पायाभूत सुविधा विकासासाठी कार्यक्रम (पी.आय.डी.ए):** एकात्मिक प्रादेशिक आणि खंडीय पायाभूत सुविधा नेटवर्क आणि सेवांमध्ये सुधारित प्रवेशाद्वारे आफ्रिकेतील सामाजिक-आर्थिक विकास आणि दारिद्र्य निर्मूलनास प्रोत्साहन देणे हे पी.आय.डी.ए चे एकूण उद्दीष्ट आहे. आफ्रिकेतील खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी जर्मन जी 20 अध्यक्षपदखाली पी.आय.डी.ए ची सुरुवात करण्यात आली.

**प्रादेशिक वित्तपुरवठा व्यवस्था (आर.एफ.ए):** आर.एफ.ए ही अशी यंत्रणा किंवा करार आहेत ज्याद्वारे देशांचे गट परस्पर त्यांच्या प्रदेशात आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या देशांना आर्थिक मदत देण्याचे वचन देतात.

**रेझीलीयंस आणि सस्टेनेबिलिटी ट्रस्ट (आर.एस.टी):** आय.एम.एफ चे आर.एस.टी कमी उत्पन्न आणि असुरक्षित मध्यम उत्पन्न देशांना बाह्य धक्क्यांना सामोरे जाण्यासाठी लवचिकता निर्माण करण्यास आणि शाश्वत विकास सुनिश्चित करण्यास आणि त्यांच्या दीर्घकालीन देयक संतुलन स्थिरतेस हातभार लावण्यासाठी मदत करण्यासाठी आहे.

**विशेष आहरण हक्क (एस.डी.आर):** एस.डी.आर ही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आय.एम.एफ) आपल्या सदस्य देशांच्या अधिकृत साठ्याला पूरक म्हणून तयार केलेली आंतरराष्ट्रीय राखीव मालमत्ता आहे. एस.डी.आर चे मूल्य अमेरिकन डॉलर, युरो, युआन, येन आणि यू.के पाउंड या जगातील पाच प्रमुख चलनांच्या बास्केटवर आधारित आहे.

**शाश्वत विकासाची लक्ष्ये (एस.डी.जी):** 2015 मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्वीकारलेले एस.डी.जी, ज्याला जागतिक लक्ष्ये सुद्धा म्हणतात, दारिद्र्य निर्मूलन, पृथ्वीचे रक्षण आणि 2030 पर्यंत सर्व लोकांना शांतता आणि समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी कृती करण्याचे सार्वत्रिक आवाहन आहे. 17 शाश्वत विकास लक्ष्ये आहेत जी एकात्मिक आहेत आणि एका क्षेत्रातील कृतीचा परिणाम इतर क्षेत्रातील परिणामांवर होतो हे अधोरेखित करतात.

**शाश्वत फायनान्स :** शाश्वत फायनान्स ही अशी प्रक्रिया आहे जी गुंतवणुकीचे निर्णय घेताना पर्यावरणीय, सामाजिक आणि प्रशासकीय (इ.एस.जी) याबद्दल विचार करते. यामुळे शाश्वत आर्थिक उपक्रम आणि प्रकल्पांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक वाढते.

**अन्न हानी आणि कचऱ्याचे मोजमाप आणि कमी करणे (टी.पी.एल.एफ.डब्ल्यू) यासाठी तांत्रिक व्यासपीठ:** हे 2015 मध्ये जी 20 तुर्की अध्यक्षपदादरम्यान सुरू केले गेले. हे व्यासपीठ अन्न हानी आणि वाया जाणे कमी करण्यासाठी जागतिक स्तरावर लागू केलेल्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि दृष्टिकोनांचा समावेश असलेल्या यशस्वी मॉडेल्सचे मोजमाप, कपात, धोरणे, युती, कृती आणि उदाहरणांवर माहिती मिळविण्यासाठी प्रवेशद्वार म्हणून कार्य करते आणि जे इतर संबंधित प्लॅटफॉर्म्ससह लिंक केलेले असते.

**टोटल लॉस शोषक क्षमता (टी.एल.एसी):** जागतिक व्यवस्थात्मक दृष्ट्या महत्वाच्या बँकांकडे (जी-सिब्स) गुंतवणूकदारांना तोटा देण्यासाठी आणि सरकारी बेलआऊटची जोखीम कमी करण्यासाठी पुरेसे इक्विटी आणि बेल-इन कर्ज आहे याची खात्री करण्यासाठी एकूण तोटा शोषून घेण्याची क्षमतेचे हे आंतरराष्ट्रीय मानक आहे.

**यु.एन.सी.एल.ओ.एस:** युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑन द लॉ ऑफ द सी (यु.एन.सी.एल.ओ.एस) 1982 मध्ये स्वीकारले गेले. हे कन्व्हेन्शनमध्ये जगातील महासागर आणि समुद्रासंबंधी कायदा आणि सुव्यवस्थेची एक व्यापक व्यवस्था लावते जी महासागर आणि त्यांच्या संसाधनांच्या सर्व वापरांवर नियंत्रण ठेवणारे नियम स्थापित करते. समुद्राच्या कायद्याच्या विशिष्ट क्षेत्रांच्या पुढील विकासासाठी एक चौकट देखील प्रदान करते.

**संयुक्त राष्ट्र-अधिवास:** संयुक्त राष्ट्रमानवी वसाहत कार्यक्रमाचे (यु.एन-हॅबिटॅट) उद्दीष्ट जगभरातील सामाजिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ निमशहरे आणि शहरांना प्रोत्साहन देणे आहे. यु.एन-हॅबिटॅट हा संयुक्त राष्ट्रांच्या व्यवस्थेतील नागरीकरण आणि मानवी वसाहतीशी संबंधित सर्व मुद्द्यांचा केंद्रबिंदू आहे.

**युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज:** युनिव्हर्सल हेल्थ कव्हरेज चा अर्थ असा आहे की सर्व लोकांना आवश्यक असलेल्या जेव्हा आणि कुठे त्यांची आवश्यकता असेल तेव्हा, आर्थिक अडचणींना सामोरे न जाता आरोग्य सेवांची उपलब्धता. यात आरोग्य संवर्धनापासून प्रतिबंध, उपचार, पुनर्वसन आणि उपशामक काळजीपर्यंत आवश्यक आरोग्य सेवांच्या संपूर्ण श्रेणीचा समावेश आहे.

**यु.एन.एस.सी ठराव 2347:** यु.एन.एस.सी ठराव 2347 मध्ये प्रामुख्याने दहशतवाद आणि सांस्कृतिक मालमत्तेचे नुकसान आणि लूट करण्याच्या दहशतवादी गटांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांविरोधात लढा देण्यावर भर देण्यात आला आहे. सशस्त्र संघर्षाच्या व्यापक संदर्भात सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्यासाठी जागतिक समुदायाचे सामायिक हित आणि कर्तव्य याकडेही लक्ष दिले आहे.

**वुमन अँतरप्रेन्योर्स फायनान्स इनिशिएटिव्ह (वी-फाय):** ऑक्टोबर 2017 मध्ये स्थापन झालेल्या वी-फायचा मुख्य उद्देश महिला उद्योजकांना वित्तीय उत्पादने आणि सेवांमध्ये पोहोच वाढविणे, क्षमता वाढविणे, नेटवर्कचा विस्तार करणे, स्थानिक आणि जागतिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी मार्गदर्शन आणि संधी प्रदान करणे आहे.

# जी 20 व्यापक आर्थिक संकेतक

| संकेतक | जी 20 (यू.एस$ ट्रिलियन) | | जगातील हिस्सा (%) | | वाढ (%) (2010-2021) |
|---|---|---|---|---|---|
| | 2010 | 2021 | 2010 | 2021 | |
| **आउटपुट / क्रियाकलाप** | | | | | |
| जी.डी.पी | 55.7 | 70.1* | 85.9 | 85.6 | 2.3# |
| मूल्यवर्धित, कृषी | 1.9 | 2.6* | 70.2 | 71.0 | 3.1# |
| मूल्यवर्धित, उद्योग | 14.3 | 18.5* | 82.9 | 83.6 | 2.6# |
| मूल्यवर्धित, सेवा | 36.3 | 45.9* | 86.9 | 86.5 | 2.4# |
| लोकसंख्या | 4.5 | 4.9 | 64.9 | 62.1 | 0.7 |
| **व्यापार/धंदा** | | | | | |
| व्यवसाय/माल निर्यात | 11.7 | 17.1 | 76.4 | 76.4 | 3.5 |
| व्यवसाय/माल आयात | 14.5 | 17.4 | 78.4 | 76.9 | 1.7 |
| एकूण व्यापारी धंदा | 26.1 | 34.4 | 77.5 | 76.7 | 2.5 |
| सेवांची निर्यात | 3.2 | 4.9 | 79.6 | 80.7 | 4.0 |
| सेवांची आयात | 3.0 | 4.4 | 77.2 | 78.0 | 3.5 |
| सेवांचा एकूण व्यापार/धंदा | 6.2 | 9.3 | 78.4 | 79.4 | 3.8 |
| **गुंतवणूक** | | | | | |
| इनवर्ड एफ.डी.आय | 1.0 | 1.1 | 72.7 | 69.8 | 0.8 |
| आउटवर्ड एफ.डी.आय | 1.1 | 1.5 | 77.0 | 87.6 | 3.1 |
| **डिजिटल अर्थव्यवस्था** | | | | | |
| डिजिटल पद्धतीने होणारी निर्यात -वितरण योग्य सेवा | 1.6 | 3.2 | 85.6 | 84.1 | 6.5 |
| आय.सी.टी सेवांची निर्यात | 0.3 | 0.7 | 85.2 | 85.1 | 9.9 |

***स्रोत:*** *आय.एम.एफ-डी.ओ.टी.एस, आय.एम.एफ-आय.एफ.एस, यु.एन.सी.टी.ए.डी, ओ.इ.सी.डी*

***टीप:*** *वाढीसाठी 2010 ते 2021 या कालावधीसाठी चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर (सी.ए.जी.आर) मोजण्यात आला आहे.*

** ही आकडेवारी 2020 सालची आहे. # सी.ए.जी.आर ची गणना 2010-2020 वर्षासाठी केली आहे*

# जी 20 कार्यकारी गट

## (भारतीय अध्यक्षता)

## शेर्पा ट्रॅक

- कृषि
- भ्रष्टाचार विरोधी आंदोलन
- संस्कृती
- डिजिटल अर्थव्यवस्था
- आपत्ती जोखीम लवचिकता आणि घट
- विकास
- शिक्षण
- रोजगार
- पर्यावरण आणि हवामान शाश्वतता
- ऊर्जा संक्रमण
- आरोग्य
- व्यापार आणि गुंतवणूक
- पर्यटन

## फायनान्स ट्रॅक

- फ्रेमवर्क वर्किंग ग्रुप (एफ.डब्ल्यू.जी)
- इंटरनॅशनल फायनान्शियल आर्किटेक्चर (आय.एफ.ए)
- इन्फ्रास्ट्रक्चर वर्किंग ग्रुप (आय.डब्ल्यू.जी)
- सस्टेनेबल फायनान्स वर्किंग ग्रुप (एस.एफ.डब्ल्यू.जी)
- ग्लोबल पार्टनरशिप फॉर फायनान्शियल इन्क्लुजन (जी.पी.एफ.आय)
- संयुक्त आर्थिक आणि स्वास्थ्य टास्क फोर्स
- अंतर्राष्ट्रीय टॅक्सेशन अजेंडा
- आर्थिक क्षेत्राचे मुद्दे/समस्या

# जी 20 सहभागी गट (एंगेजमेंट ग्रुप्स)

## (भारतीय अध्यक्षता)

- बिझनेस 20 (बी20)
- सिव्हिल 20 (सी20)
- लेबर 20 (एल 20)
- संसद 20 (पी20)
- विज्ञान 20 (एस20)
- सुप्रीम ऑडिट इंस्टिट्यूशन्स 20 (एस.ए.आय20)
- स्टार्टअप 20 (एस20)
- थिंक 20 (टी20)
- अर्बन 20 (यू20)
- महिला 20 (डब्ल्यू20)
- युवा 20 (वाय20)

# जी 20 चे कायम निमंत्रित असणारे

## देश

- स्पेन

## आंतरराष्ट्रीय संघटना

- संयुक्त राष्ट्र (यु.एन)
- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आय.एम.एफ)
- जागतिक बँक (डब्ल्यू.बी)
- जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यू.एच.ओ)
- जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यू.टी.ओ)
- इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन (आय.एल.ओ)
- वित्तीय स्थिरता बोर्ड (एफ.एस.बी)
- ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट (ओ.इ.सी.डी)
- आफ्रिकन युनियन (ए.यू)
- आफ्रिकन युनियन डेव्हलपमेंट एजन्सी (ए.यू.डी.ए-एन.ई.पी.ए.डी)
- दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रांची संघटना (एशियन)

# पाहुणे देश आणि आंतरराष्ट्रीय संघटना
## (जी 20 भारतीय अध्यक्षता 2023)

## देश

- बांगलादेश
- इजिप्त
- मॉरिशिअस
- नेदरलँड्स
- नायजेरिया
- ओमान
- सिंगापुर
- यु.ए.ई

## आंतरराष्ट्रीय संघटना

- इंटरनॅशनल सोलर अलायन्स (आय.एस.ए)
- कोएलिशन फॉर डीझासटर रेझीलीयंट इन्फ्रास्ट्रक्चर (सी.डी.आर.आय)
- एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी)

# जी 20 सदस्य देश


ऑस्ट्रेलिया



अर्जेंटीना


ब्राझील


कॅनडा



चीन


ई.यु


फ्रांस


जर्मनी


भारत


इंडोनेशिया


इटली


जपान


मेक्सिको


रशिया


दक्षिण आफ्रिका


सौदी अरेबिया


दक्षिण कोरिया


तुर्की


यु.एस.ए


यु.के

भारत 2023 INDIA

## भारतीय जी 20 अध्यक्षपद: सोशल मीडिया कवरेज

**https://www.g20.org**

https://twitter.com/g20org

https://www.facebook.com/g20org

https://www.instagram.com/g20org/?hl=en

https://www.youtube.com/channel/UCspVYmJSYUek633_enhLo3w

**हा दस्तऐवज मिळवण्यासाठी आणि मागील जी 20 आणि टी 20 माहितीपत्रके मिळवण्यासाठी : https://bit.ly/3UiAa9s यावर क्लिक करा**

**स्कॅन करा क्यू.आर कोड**

फोटोचे श्रेय: pixabay.com